**UGC Sponsored Minor Research Project**

**लघुशोध प्रकल्प**

**[१९७५ ते २००० या कालखंडातील मल्लिका अमरशेख, अरुणा ढेरे, नीरजा या मराठी कवयित्रीच्या काव्यातील स्त्री जाणीवांचा अभ्यास]**

**Principal Investigator :**
**Dr. Amruta I.Dorlikar**
**Asst . Professor**
**Dr. Madhukarrao Wasnik P.W.S. Arts,**
**Commmerce & Science College, Nagpur.**

**Objectives of the Projects : (उद्‌दिष्ट)**

१) स्त्रीवाद आणि स्त्रियांच्या कवितेतून व्यक्त होणारे समाजभान.

२) कवयित्री मल्लिका अमरशेख यांच्या कवितेची वैशिष्ट्ये.

३) कवयित्री  अरुणा ढेरे यांच्या कवितेची वैशिष्ट्ये.

४) कवयित्री नीरजा यांच्या कवितेची वैशिष्टये.

५) वरील कवयित्रीच्या काव्याचे मराठी साहित्यात योगदान अधोरेखित करणे.

६) वरील कवयित्रींच्या काव्याचा तुलनात्मक अभ्यास आणि त्यांचे निष्कर्ष मांडणे.

**Summary : (सारांश)**

१९७५ हो वर्ष आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष म्हणून जाहीर झाले. त्या निमित्ताने स्त्रियांच्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार होऊ लागला. स्त्री मुकतीचा विचार मूळ धरू लागला. स्त्रीविषयक जाणीवा असलेले कथा, कादेसरी, कविता हे नवीन वाङ्मय प्रकार अस्तित्वात आले त्यातही कविता या वाङ्मय प्रकारात १९७५ नंतर स्त्रियांची कविता अधिकाधिक सखोल व डोळस होत गेली. या कालखंडातील कवयित्रींच्या सामाजिक जाणीवेचे क्षितीज उंचावलेले आहे.

कवितेविषयीच्या जाणीवा कवितेतून व्यक्त होणाऱ्या वृत्तीप्रवृत्ती आणि कवितेचे स्वरूप याबाबतीत पूर्वी कधीही आढळले नव्हते एवढे वैविध्य याकाळातील स्त्रियांच्या काव्यलेखनात आढळते. या काळातल्या कवयित्रींनी आपल्या आधीच्या व समकालीन कवयित्रीचे संस्कार घेतले त्याचबरोबर आशय आणि अभिव्यक्ती या बाबतीत आपल्या स्वतःच्या नव्या वाटा शोधण्याचाही मनःपूर्वक प्रयत्न केलेला दिसतो. १९७५ नंतर भारतीय समाजजीवनात जी स्थित्यंतरे होत गेली. समाजवास्तव बदलत गेले त्यांचेही प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष परिणाम या काळातल्या कवितेवर होत गेलेले दिसतात. आणि ते नव्या पिढीच्या कवयित्रींच्या कवितेतून दिसतात.

१९७५ ते २००० या काळातील स्त्रीचे बदलते मानसविश्व मल्लिका अमरशेख, अरुणा ढेरे, नीरजा यांच्या कवितेतून निखळपणे व्यक्त होताना दिसतात. या काळात स्त्रियांच्या मनाने जो प्रवास केला आहे तो प्रवासही या कवितांमधून स्पष्टपणे दिसून येतो. त्या वेदनांमध्ये कुटूंबात होणारी उपेक्षा, पतीविषयी भ्रमनिरास आईवडिलांच्या जपणुकीच्या मायेने दुःख सोसण्याची कमी झालेली ताकद अशा वेदनेच्या छटा व्यक्त होतात. स्त्रीला स्वतःचे अस्तित्व आहे ही जाणीव नव्याने व्हायला लागली. परिवर्तनाच्या या काळात स्त्रीच्या कवितेला आलेली धार, धीटपणा, भाषेतील दाहकता स्त्री कवितेत कधीच प्रत्ययाला आली नाही. रोजच्या जगण्यातले संदर्भ आडपडदा न ठेवता स्त्रीपूर्वी कधी मांडत नव्हती पण १९७५ नंतर मात्र एक वेगळे चित्र मराठी कवितेतून उमटले ते स्त्रीवादी भूमिकेतून ! या काळातल्या कवकीच्या काव्याचा अभ्यास करताना काही प्रमुख कवयित्रींची नावे डोळ्यासमोर येतात. मल्लिका अमरशेख, अरुणा ढेरे, रजनी परुळेकर, प्रभा गणोरकर, प्रज्ञा लोखंडी, अश्विनी धोंगडे, अंजली कुळकर्णी, अनुराधा पाटील, नीरजा इ. कवयित्रींच्या कवितेतून दःख ओलांडून जाणाऱ्या स्त्रीला हक्काची जाणीव होते. विद्रोहाची ताकद तिच्यामध्ये येते. पारंपारिक कल्पना, बंधने यापलिकडे जाण्याची ओढ लागते. त्यासाठी स्वतःमध्ये बळ एकवटण्याची गरज भासते. वेदनेच्या पाठोपाठ विद्रोहाची स्वतःच्या अस्मितेची धगही कवितांमधून स्पष्टपणे व्यक्त होते. सोसत बसण्याची गरज नाही चौकटीतून बाहेर पडले पाहिजे याची जाणीव होते. एकदा ही जाणीव झाल्यावर विविध रूपाने ती कवितेत व्यक्त होताना दिसते. मल्लिका अमरशेख, अरुणा ढेरे,

नीरजा या तिनही कवयित्रींच्या काव्याची तुलनात्मकता स्पष्ट करताना मल्लिका अमरशेख यांच्या कवितेत जीवनविषयक आकलन एकटेपणाची जाणीव, आयुष्याची निरर्थकता व मानवी संबंधाचे अर्थशुन्यत्व आणि संपूर्ण मानवजाती विषयी वाटणारी अथांग करुणा हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

अरुणा ढेरे यांच्या कवितांमध्ये लोकगीताच्या छटा उमटलेल्या दिसतात. स्वतःचा शोध घेणारी त्यांची कविता आहे. परंपरा आणि आधुनिकता यांच्या सीमारेषेवर उभ्या असलेल्या स्त्रीची कविता आहे असे त्यांच्या कवितेच्या संदर्भात म्हणता येते.

नीरजा यांच्या कविता स्त्रीकेंद्री नाही तर स्त्रीवादी आहे. पुरुषी सत्तेच्या जाणीवेतून निर्माण होणारी लैगिंक शोषणाची, स्त्रीच्या असहायतेची वेदनेची, अन्यायाची भावना नीरजाने परोपरीने व्यक्त केलेली आहे.

**Contribution to the Society**

१९७५ ते २००० या दरमान्यचा काळ खूपच महत्वाचा होता सुरुवातीच्या स्त्रीवादांतर्गत अस्तित्वात असणाऱ्या भूमिकेतील संदिग्धपणा, कडवेपणा या दरम्यान नाहीसा होत असल्याचा प्रत्यय येतो स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळावे तिला 'माणूस' म्हणून मान्यता मिळावी यासाठी समाजजीवनातील सर्व महत्वाची क्षेत्रे स्त्रीवादाने स्त्रीवादी गृहितकांच्या पायावर आणि नवीन ज्ञान निर्मितीच्या हेतूने धुंडाळल्यास मल्लिका अमरशेख, अरुणा ढेरे, नीरजा यांच्या कवितांमधून स्त्रीवादी भूमिका अधिक स्पष्ट झाली आहे त्या दृष्टीने स्त्रियांच्या पुरुषांपासून वेगळ्या असलेल्या जाणीवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाङ्मयीन बंधाची गरज यातून निर्माण होईल. आजच्या काळात काव्यलेखन करणाऱ्या स्त्रिया यातून प्रेरणा घेऊन नवीन जीवन जाणीवा प्रेरणा आपल्या काव्यात मांडण्याचा प्रयत्न करू शकेल. जागतिकीकरणाचा आणि तांत्रिक युगाचा बदल, सांस्कृतिक बदल आणि जीवनात येणाऱ्या नवीन आव्हानाना सामोरे जाण्याचे बळ अंगी निर्माण होईल. स्त्रियांच्या नव्या जाणीवा यातून वृद्धींगत होण्यास चालना मिळेल.

Xxxxxx 0000 xxxxx